# बृहन्मुंबई महानगरपालिका
## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मुंबई अग्निशमन दलाच्या आस्थापनेवरील रु.21700- 69100 अधिक अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीतील "अग्निशामक" या संवर्गातील सद्या रिक्त असलेली व संभाव्य रिक्त पदे सरळसेवेने (वॉक इन सिलेक्शन) पध्दतीने भरावयाची आहेत.

| एकूण पदे | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 910 | 99 | 26 | 18 | 14 | 22 | 16 | 08 | 173 | 91 | 443 |

वरील अनुशेषावर खालीलप्रमाणे समांतर आरक्षण असेल.

| अ.क्र. | समांतर/इतर आरक्षण | जात प्रवर्ग | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
| 1 | माजी सैनिक | 15 | 04 | 03 | 02 | 03 | 02 | 01 | 26 | 14 | 66 | 136 |
| 2 | खेळाडू | 05 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | - | 09 | 05 | 22 | 46 |
| 3 | प्रकल्पग्रस्त | 05 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | - | 09 | 05 | 22 | 46 |
| 4 | भूकंपग्रस्त | 02 | 01 | - | - | - | - | - | 03 | 02 | 09 | 17 |
| 5 | महिला | 30 | 08 | 05 | 04 | 07 | 05 | 02 | 52 | 27 | 133 | 273 |
| 6 | सर्वसाधारण आरक्षण | 42 | 11 | 08 | 06 | 10 | 07 | 05 | 74 | 38 | 191 | 392 |
| 7 | एकूण | 99 | 26 | 18 | 14 | 22 | 16 | 08 | 173 | 91 | 443 | 910 |
| 8 | अनाथ | 09 पदे | | | | | | | | | | |
| 9 | दिव्यांग | 37 पदे (दिव्यांग आरक्षण लागू होणार नाही असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे त्यासापेक्ष.) | | | | | | | | | | |

टिप - उपरोक्त संवर्गातील अनुशेषांतर्गत पदांमध्ये माजी सैनिकांसाठी 15 टक्के, खेळाडूसाठी 5 टक्के, मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्प अंतर्गत बाधित 5 टक्के, भूकंपग्रस्त 2 टक्के, महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ही पदे शासन निर्देश संदर्भित करुन त्यातील अटीनुसार भरण्यात येतील.

अनाथांसाठी 1 टक्के आरक्षण प्रमाणे एकूण उपलब्ध रिक्त पदांनुसार 09 पदे आरक्षित होत आहेत. सदर पदे शासन निर्णय क्र.अनाथ-2018/प्र.क्र.182/का-03 दि.23.08.2021 संदर्भित करुन भरण्यात येतील. भरती अंतर्गत पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास खुला प्रवर्गातील (सर्वसाधारण) एकूण रिक्त पदांमधून 09 पदे रिक्त ठेवण्यात येतील.

शासन निर्णय क्र. दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16अ दि.29.5.2019 नुसार शारिरीकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी 4% आरक्षण विहित करणे व आरक्षण अंमलबजावणी करण्याचे निर्देश आहेत. त्याप्रमाणे भरती वर्ष दि.01.01.2022 ते दि.31.12.2022 ह्या कालावधीत मुंबई अग्निशमन दलाच्या गट 'ड' मधील सर्व संवर्गातील एकूण 932 रिक्त पदांवर 4% प्रमाणे 37 पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित होत आहेत. तथापि, मुंबई अग्निशमन दल हे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्यामुळे सर्व पदांच्या निकषानुसार उमेदवार/कर्मचारी हा शारीरीक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. यास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मुंबई अग्निशमन दलातील प्रत्यक्ष कार्यवाहीवरील

सरळसेवा/पदोन्नतीने भरण्यात येणा-या पदांना शारिरीकदृष्टया दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षण लागू होणार नाही असा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला आहे. तद्अनुषंगाने शासनाच्या प्राप्त होणा-या मंजूरीसापेक्ष व उक्त शासन निर्णयातील निदेशानुसार 'अग्निशामक' संवर्गातील खुला प्रवर्गातील (सर्वसाधारण) एकूण रिक्त पदांमधून 37 पदे दिव्यांग व्यक्तीसाठी रिक्त ठेवण्यात येतील.

**अर्हता-**

| | |
|---|---|
| 1. | उमेदवार मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची कला, विज्ञान, किंवा वाणिज्य शाखेतील इयत्ता 12 वी किमान 50 टक्के गुणांसह प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असावा.<br>माजी सैनिकांसाठी -<br>उपरोक्त अर्हता धारण केलेली असावी .<br>किंवा<br>उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता 10 वी ) उत्तीर्ण असावा व त्याच्याकडे भारतीय सेनेत किमान 15 वर्षे सेवा केल्याबाबत पदवी प्रमाणपत्र असावे. |
| 2. | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| 3. | वैदयकीय दर्जा – उमेदवार शारीरिक आणि मानसिकदृष्टया सदृढ असावा. सर्व प्रकारच्या संसर्गजन्य रोगांपासून मुक्त असावा. |
| 4. | उमेदवाराकडे खालील नमूद केलेला किमान शारिरीक दर्जा असणे आवश्यक आहे.<br>उंची-किमान 172 से.मी. (पुरुषांसाठी)<br>उंची-किमान 162 से.मी. (महिलांसाठी)<br>छाती-81 से.मी. (साधारण), 86 से.मी. (फुगवून) (महिलांसाठी छातीची अट लागू नाही)<br>वजन- किमान 50 कि.ग्रॅ.<br>दृष्टी- चष्मा किंवा तत्सम साधनांशिवाय नेहमीची (सामान्य), वर्णान्धता: आजारापासून मुक्त असावा. |
| 5. | वयोमर्यादा- उमेदवारांचे वय दि.31.12.2022 रोजी 20 वर्षापेक्षा कमी व 25 वर्षापेक्षा जास्त नसावे. परंतु कोविड-19 सार्वत्रिक साथरोगामुळे भरती प्रक्रीया राबविण्यात आलेली नसल्यामुळे फक्त या भरती प्रक्रीयेकरिता एक वेळची उपाययोजना म्हणून उमेदवारांचे वय दि.31.12.2022 रोजी 20 वर्षापेक्षा कमी व 27 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवार, युध्दात मृत्यू पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबनिवृत्ती वेतनावर अवलंबून असलेले उमेदवार, माजी सैनिक व महानगरपालिका कर्मचा-यांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा 05 वर्षांनी शिथिल करण्यात येईल. खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 05 वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे इतकी राहील. शासन निर्णयानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्ग व अनाथ आरक्षणामधून अर्ज करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा 05 वर्षांनी शिथिल करण्यात येईल. |
| 6. | जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. |
| 7. | महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा-या व्यवसाय/शारिरीक चाचणीत उमेदवार उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अशाच उमेदवारांचा त्यांच्या गुणवत्तेनुसार निवडीकरिता विचार करण्यात येईल. |
| 8. | उमेदवार 'डि.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीचे 'सी.सी.सी.'किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा महाराष्ट्र शासन या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल अशी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, अर्ज सादर करताना सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसल्यास निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत शासनाने विहित केलेली 'एम.एस.सी.आय.टी.' ची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |

उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीसाठी हजर रहावयाचे ठिकाण व वेळापत्रक, निवडीचे निकष व कार्यपध्दती, व्यावसायिक चाचणी, सर्वसाधारण अटी व शर्ती, विशेष सूचना याबाबतची संपूर्ण माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

खुला/अराखीव प्रवर्ग- रु. ९४४/- आणि मागासवर्गीय व आदुघ/अनाथ आरक्षण अंतर्गत अर्ज करणारे उमेदवार- रु.590/- इतके भरती प्रक्रीया शुल्क (वस्तू व सेवा कर सहीत) 'बृहन्मुंबई महानगरपालिका' (Brihanmumbai Municipal Corporation) या नावाने मुंबईत देय असलेला (Payable at Mumbai) डिमांड ड्राफ्ट भरतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

डिमांड ड्राफ्ट नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही व सदर उमेदवारास भरती प्रक्रीयेत समाविष्ट केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
प्रमुख अग्निशमन अधिकारी
मुंबई अग्निशमन दल